**मार्गदर्शक सुचना**

जा.क्र.कृआ/विप्र.-४/कृ.भू.पु./मा.सू.२०१२/१४८/२०१३
कृषि आयुक्तालय, म.रा., पुणे- ५,
दिनांक :- ०८/०३/२०१३

प्रति,
विभागीय कृषि सह संचालक
----------विभाग ---------

विषयः-सन २०१२ करीता वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कारासाठीव्यक्ती/संस्थांची निवड करणेबाबत.

दरवर्षी मा. राज्यपालांच्या हस्ते ज्या व्यक्तींनी/संस्थांनी कृषि क्षेत्र व त्या क्षेत्राशी संलग्न असणा-या ग्रामीण विकास इत्यादी क्षेत्रात अद्‌वितीय कामगिरी बजावली आहे, त्यांना कृषिभूषण हा बहुमान देण्यात येतो. सदर कार्यक्रम आयोजित करण्याचे दृष्टीने प्रस्ताव सादर करावयाचे आहेत.

सन २०१२ करीता वसंतराव नाईक कृषिभूषण या पुरस्कारासाठी योग्य व्यक्तींची निवड होण्याच्या दृष्टीने शासन निर्णय क्रमांक. कृसंप्र १००३/प्र.क्रं ५२/ ११ अे, दिनांक २२ ऑगस्ट २००३ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा व विभागीय स्तरावर समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. पुरस्काराकरिता शिफारशी साठी पुरस्कारार्थींची सर्वसाधारण माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्र अ प्रमाणे तर त्याच्या उल्लेखनीय कार्याबाबतची माहिती प्रपत्र ब मध्ये प्राप्त करुन घेऊन जिल्हा स्तरावर गठीत करण्यात आलेली समिती जिल्हयातील सर्व पुरस्कारार्थींच्या प्रक्षेत्रास समक्ष भेट देऊन प्रस्ताव विभागीय स्तरावर सादर करेल. विभागीय स्तरावरील समितीने प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करुन आपल्या शिफारशीसह शासन निर्णयाचे अधिन राहून आयुक्तालयास सादर पाठवावेत. तसेच प्रपत्र क मध्ये संबंधिताच्या प्रस्तावाची थोडक्यात माहिती आयुक्तालयास सादर करावी.

मा. मंत्री व मा. राज्यमंत्री यांचेकडूनही काही व्यक्तींची शिफारस करण्यांत येते. तसेच विभागाचे सचिव व विभागीय आयुक्त यांचेकडून काही व्यक्तींची शिफारस करण्यांत येते. अशा प्रकारे शासनाकडून शिफारस केलेले प्रस्ताव कृषि आयुक्तालयास प्राप्त होतात. अशा

प्राप्त प्रस्तावाची माहिती विहित प्रपत्रात नसल्यामुळे त्या व्यक्तींची माहिती विहित प्रपत्रात प्राप्त करुन घेण्यासाठी व वस्तुस्थिती अजमावण्यासाठी सदर प्रस्ताव अभिप्रायासाठी आपणाकडे पाठविण्यांत येतील. अशा प्राप्त प्रस्तावाची छाननी जिल्हा व विभागीय स्तरावर गठीत करण्यात आलेल्या समित्यामार्फत करावी. पुरस्कारार्थीच्या कामाबाबत व त्यांचे काम अतिउत्कृष्ट किंवा अतिउल्लेखनीय का आहे ? याबाबत समितीने अभिप्राय दयावेत.

कृषी विकासांसाठी उल्लेखनिय कामाबाबत कृषी विभाग, महाराष्ट्र शासनाचे वतीने कृषी पुरस्कार प्रदान करण्यात आलेल्या व्यक्ति, संस्थांचा पुनःश्च इतर कृषी पुरस्कारासठी प्रस्ताव प्राप्त होतात . अशा परिस्थितीत प्रस्तावाची गुणवत्तेनूसार शिफारस करतांना यापूर्वी देण्यात आलेल्या कृषी पुरस्कारास पाच वर्षाचा कालावधी झाला असल्याची खात्री करण्यात यावे.

याप्रमाणे आपल्या कार्यक्षेत्रातील वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कारासाठी प्रस्ताव शिफारशीसह दिनांक २५/०३ /२०१३ पर्यंत प्रस्ताव सादर करावेत.

स्वाक्षरित/-

सोबत : प्रपत्र अ, ब व क

कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ५

प्रत :-

माहितीस्तव सविनय सादर

१. मा. प्रधान सचिव (कृषि व फलोत्पादन), कृषि व प. दु. म. विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
२. मा. आयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय / साखर / सहकार / महसूल (सर्व)
   यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
३. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,...................... (सर्व)
४. कृषि विकास अधिकारी, जि.प....................... (सर्व)

स्वाक्षरित/-

कृषि उपसंचालक ( माहिती )
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ५

**वसंतराव नाईक कृषिभूषण शिफारस करताना वापरावयाचे**

**प्रपत्र -अ**

| | | |
|---|---|---|
| १ | व्यक्तीचे संपूर्ण नांव | |
| २ | कायमचा पत्ता ( संपूर्ण पत्ता दयावा) | |
| ३ | पत्रव्यवहारासाठी पूर्ण पत्ता | |
| ४ | अ. दुरध्वनी क्रमांक (एस.टी.डी. कोडसहीत)<br>ब. भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल नंबर) | |
| ५ | अ. ई-मेल<br>ब. वेबसाईट | |
| ६ | जन्मतारीख व वय | |
| ७ | शिक्षण | |
| ८ | व्यवसाय | |
| ९ | शेतकऱ्याचा आधार कार्ड क्रमांक व बँकेचा खाते क्रमांक | |
| १० | त्यांना शासन / शासन पुरस्कृत संस्थेमार्फत पगार / पेन्शन मिळते काय ?(रु. १०० च्या स्टँपवर शासन अंगीकृत संस्थेमध्ये नोकरी करत नसलेबाबत प्रतिज्ञापत्र) | |
| ११ | पूर्वी मिळालेला सन्मान/पुरस्कार आणि कोणत्या वर्षी व कशासाठी. (प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह जोडावा) | |
| १२ | चारित्र्य कसे आहे (सोबत जि.पो.अ.दाखला मुळप्रत असावी) | |
| १३ | वरील व्यक्तीचे केलेले काम सर्वसामान्य शेतक-यांना उपयोगी मार्गदर्शक कसे तसेच त्यांचे काम अतिउत्कृष्ट किंवा उल्लेखनिय कसे याबाबत सविस्तर माहिती. | |
| १४ | परिचय लेख (सोबत स्वतंत्र देण्यात यावा). | |
| १५ | माहिती तंत्रज्ञानाचा कृषि विकासाकरीता वापर करतात का ? कशाप्रकारे करतात ? | |
| १६ | कृषि विकास अधिकारी यांनी प्रत्यक्ष शेतीस भेट देऊन प्रस्ताव निकषाप्रमाणे योग्य असल्यास शिफारशीसह अभिप्राय द्‌यावेत. | |

सही/
कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद................

सही/-
जिल्हा अधिक्षक कृषिअधिकरी
जिल्हा.................

## वसंतराव नाईक कृषिभूषण शिफारस करताना वापरावयाचे

### प्रपत्र - ब

| | | |
|---|---|---|
| १ | शेतकऱ्याचे नांव व पत्ता | |
| २ | धारण केलेले एकूण क्षेत्र ( ८ अ प्रमाणे) | |
| ३ | फळबाग लागवडीचे क्षेत्र (फळपिक निहाय) | |
| ४ | जमिनीचा विकास (मृद - जल संधारणाचे उपचारीत क्षेत्र ) | |
| ५ | कंपोस्ट/ हिरवळीचे / गांडूळ खताचा वापर | |
| ६ | ॲझो / रायझो/ पीएसबी/ उतीसंवर्धन यांचा वापर | |
| ७ | मातीचे नमुने तपासून त्याप्रमाणे रासायनिक खतांचा वापर | |
| ८ | एकात्मिक पीक संरक्षण कार्यक्रमाचा अवलंब | |
| ९ | कृषि विदयापीठे, कृषि प्रतिष्ठान व तत्सम संस्थांना भेटी देऊन तेथील तंत्रज्ञानाचा अवलंब | |
| १० | सिंचनाच्या पाण्याचा किफायतशीर वापर/ठिबक/तुषार वापर करतात काय १ | |
| ११ | स्वतः विकसित केलेले तंत्रज्ञान | |
| १२ | सहकार ग्रामीण विकास, कृषि फलोत्पादन, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय क्षेत्रातील कार्य. | |
| १३ | वृत्तपत्र लेख, कृषि साहित्य इ. मार्गाने केलेले कार्य | |
| १४ | व्यक्ती / संस्थेची प्रकाशने | |
| १५ | सामाजिक कार्य | |
| १६ | कृषि माल प्रक्रिया, निर्यातीसंदर्भात केलेले कार्य | |
| १७ | परिसरातील इतर शेतकऱ्यांना कशा प्रकारे उपयोग झाला त्याचा सविस्तर तपशिल द्यावा. | |
| १८ | कोरडवाहू शेती तंत्रज्ञानाचा वापर कितपत करतात (तपशिल दयावा) | |

| | | |
|---|---|---|
| १९ | शेतकऱ्याकडील शेतातील विविध पिकांची उत्पादकता (क्विंटल/हेक्टरी) जिल्हयाच्या सरासरी उत्पादकतेशी तुलना करुन मागील चार वर्षाची माहिती दयावी. | |
| २० | शेतीपासून मिळणारे निव्वळ उत्पन्न (रुपये) | |
| २१ | शेती पूरक व्यवसाय करतात काय ? पुरक व्यवसायापासून मिळणारे निव्वळ उत्पन्न (रुपये) | |
| २२ | उच्च तंत्रज्ञानावर आधारीत काही प्रकल्प राबवितात काय ? तपशिल द्यावा. | |
| २३ | शेतमालाची साठवण / प्रक्रिया करतात काय ? कशी ? | |
| २४ | पीक काढणी नंतरचे तंत्रज्ञान (प्रतवारी आणि साठवूणक )चा वापर करतात काय? कशा प्रकारे | |
| २५ | पिक उत्पादनाची विक्री कशाप्रकारे करतात ? | |
| २६ | शेतीविषयक पुस्तके, मासिकांचे वर्गणीदार आहेत काय ? किती ? | |
| २७ | कृषि तंत्रज्ञानाचा प्रसार, परिसरातील कोणकोणत्या शेतक-यांना प्रत्यक्ष प्रक्षेत्रास भेट देवून केला ? (सोबत यादी जोडली आहे). | |
| २८ | राज्यपातळी, जिल्हापातळी व पंचायत समिती स्तरावरील पीकस्पर्धा या मध्ये भाग घेतात का ? किती वेळा व कोणत्या पिकासाठी ? | |
| २९ | सुधारीत/उच्च तंत्रज्ञानावर आधारीत त्यांनी धारण केलेल्या प्रक्षेत्रावर प्रात्यक्षिके घेतली आहेत काय ? | |
| ३० | कृषि मालावर आधारीत कोणकोणते गृहउदयोग करतात ? | |
| ३१ | कृषि मालावर आधारीत गृहउदयोग करत असल्यास त्याची माहीती प्रशिक्षणाव्दारे करुन दिली आहे काय ? | |
| ३२ | अभ्यास दौरे - तपशील व परिणामकारकता<br>अ. राज्याबाहेर देशातंर्गत अभ्यास दौरे<br>ब. देशाबाहेर अभ्यास दौरे | |

सही /
कृषि विकास अधिकारी....,
जिल्हा परिषद....

सही/
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
जिल्हा

## प्रपत्र क (१)

## वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार करीता कार्यविवरण

## प्रस्तावित पुरस्कार

| अ. क्र. | व्यक्तीचे / संस्थेचे पूर्ण नाव व पत्ता (सर्वश्री) | जिल्हा | पूर्वी मिळालेले पुरस्कार | कार्यविवरण ( उल्लेखनीय बाबी , क्षेत्र इ. ) |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |

## प्रपत्र क (२)

## वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार निकष चेकलिस्ट

| अ.क्र | व्यक्ती/संस्थेचे नांव सर्वश्री | पत्ता | विचारात घ्यावयाचे मुद्दे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शिफारस कोणी केली | यापुर्वी मिळालेले पुरस्कार | कृषि व संलग्न क्षेत्रात केलेले अतिउत्कृष्ट व अति उल्लेख्ननिय काम | व्यक्ति शासनाच्या निधीतून वेतन / पेन्शन / मानधन घेतात काय? | नाम निर्देशने प्रचलीत पध्दतीनुसार प्राप्त झाली का? | जिल्हा समितीने प्रत्यक्ष प्रक्षेत्रास भेट देउन प्रस्ताव सादर केला आहे काय? | पुरस्कार्थीच्या प्रक्षेत्रास विभाग समितीने भेट देवून , छाननी करुन शिफारस केली आहे काय ? |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | | | | | | | | | |